International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# विदर्भातील मराठी आंबेडकरवादी गझल

**कु. स्वाती लक्ष्मणराव भगत, डॉ. युवराज मानकर**
*संशोधक, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव*
*मार्गदर्शक, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव*
*Corresponding Author – कु. स्वाती लक्ष्मणराव भगत*
DOI - 10.5281/zenodo.15245401

**सारांश:**

*'गझल ' ही इस्लामी संस्कृतीकडून भारतीय संगीतास मिळालेली एक देणगी आहे मुळात गझल हा एक वृत्त प्रकार (Poetry Jyner) आहे . गझल व रुबाई हा कवी प्रकार फारशीतून मराठीत आणण्याचे श्रेय माधव ज्युलियन यांना दिले जाते. परंतु खऱ्या अर्थाने मराठीत गझलरुपी रोपट्याला रुजवले, वाढवले , व जतन केले ते गझलसम्राट सुरेश भट यांनी विदर्भाच्या मातीत जन्माला आलेल्या सुरेश भटांनी मराठी गझलेला समृद्ध व संपन्न केले .त्यांनी हिंदी व उर्दू भाषेत सुद्धा गझला लिहिल्या ते शुद्ध मानवतावादी विचारांचे गझलकार होते .त्यांच्या अनेक गझलांमधून मानवतावादी सामाजिक विचार अभिव्यक्त झालेला आहे. गझल सम्राट सुरेश भटांच्या प्रभावळीत निर्माण झालेले आंबेडकरवादी गझलकार गझल लेखन करीत आहेत . उदा.भाऊ पंचभाई, नागोराव पाटणकर , हृदय चक्रधर इ. अशाच आंबेडकरी विचारांच्या गझलेचे संशोधन या लेखातून करण्यात आले आहे .*

***बीज शब्द: आंबेडकरवाद,गझल ,काफिया , रदीफ , वृत्त, प्रतिथयश.***

**आंबेडकरी गझल:**

बाबासाहेब आंबेडकर प्रणित तत्त्वज्ञान हे एक सर्व स्पर्शी असे तत्त्वज्ञान मानले जाते. हे तत्त्वज्ञान विसाव्या शतकाच्या मध्यानंतर आंबेडकरवादी या नावाने अभ्यासकाने व विचारवंतांनी मांडलेले आहे .आंबेडकर वादाचे वैशिष्ट्य हे आहे की, आंबेडकरवाद सतत परिवर्तनाशी बांधला गेलेला आहे, इहवाद आणि समाजवाद ही त्यांचे ध्येय आहे. "Everything is changing, that change in the law of life for individuals as well as for societiy"(१) आंबेडकरी गझल ही महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वांनी प्रेरित असलेली अखिल मानव जातीच्या कल्याणाची भूमिका घेणारी विचारशील विधा आहे .या गझलेची सूत्रे आपणास महात्मा फुले यांच्या साहित्यात ,संत तुकारामांच्या अभंगात ,संत कबीरांच्या दोह्यात , महावीर व बुद्धांच्या धम्म उपदेशात दिसून पडतात.

**गझल सम्राट सुरेश भट:**

सुरेश भट यांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी झाला. सुरेश भटांच्या अनेक गीतांमधून व गझलेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर , गौतम बुद्ध आणि महात्मा फुले यांचे विचार व्यक्त होऊ लागले.त्यांचे 'भीमराया घे तुझ्या या लेकराची वंदना ' हे गीत अत्यंत गाजले. मराठी काव्य क्षेत्रातील मनोरम वाटिकेत गझलरुपी अमृताचे रोपटे रुजवण्यासाठी सुरेश भटांनी आपल्याला जी यातायात करावी लागली याचे यथायोग्य वर्णन त्यांच्या या शेरात आलेले आहे.

**"जाणते ही बाग माझ्या सोसण्याच्या सार्थकाला**
**मी इथे हे अमृताचे रोपटे रुजवून गेलो."(१)**

'झंजावात' हा गझल संग्रह त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सविनय अर्पण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाने अंधारलेल्या जगाला साथ देताना सुरेश भट म्हणतात.

**कुठे गेलास तू? माया तुझी का आटली बाबा?**
**कुठे गेलास तू? छाती जगाची फाटली बाबा?**

(बदी उजमा बिराजदार गझल मंथन साहित्य संस्था, १४ एप्रिल २०२४)

मराठी काव्याला एक वेगळे वळण लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीतून प्रत्ययाला येते. "एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व एकच अंत्य यमक (रदीफ) असलेल्या प्रत्येकी २-२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल होय."अशी गझलेची व्याख्या भटांनी केली आहे.दुर्बोध, शब्दबंबाळ हे काव्य नवकवितेच्या सागरात प्रचंड ताकदीने पेलून घेण्याचे कार्य सुरेश भटांच्या गझलांनी केले. आणि नवी सामाजिक जाणीव , राजकारणातील झुंडशाही,महापुरुषांचे भांडवल इत्यादी नवनवीन विषय असलेल्या गझलेच्या माध्यमातून मांडून तिला समृद्ध त्यांनी केले. सर्वसामान्य शोषित यांच्यातील पारंपारिक महदंतर व्यक्त करताना ते म्हणतात.

**" ते जन्मताच त्यांच्या हाती गुलाब होते**
**आम्हा भिकाऱ्यांना हे पोट हा रगडा"**

सुरेश भटांच्या गझलेत 'मी 'आणि 'ते 'ही सर्वनामे वारंवार येतात. 'मी ' हे सर्वनामे शोषित, वंचित, पीडित, आणि दलित वर्गाचे प्रतिनिधित्व करते. तर ' ते' हे सर्वनाम अन्याय कर्ते ,श्रीमंत, धनीक यांचे प्रतिनिधित्व करते. मराठी गझल ही उर्दूतील उचल किंवा थुंकी आहे असा हिनकस आरोप करणाऱ्या तथाकथित समीक्षकांना भटांनी सडेतोड उत्तर दिले आहे ते म्हणतात. "साय मी खातो मराठीच्या दुधाची मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला". सुरेश भटांनी समता, स्वातंत्र्य, आणि बंदुत्वाचा विचार घरोघरी पोहोचवला. गझल हे क्षेत्र त्यांनी जाणीवपूर्वक व हेतू बुद्धी परस्पर निवडले. यासाठी त्यांनी अविश्रांत मेहनत घेतली. व गझलेला संपन्न व समृद्ध केले.इश्क ,प्रेम , शृंगार व अध्यात्म यातून गझलेला बाहेर काढून सामाजिक, राजकीय वास्तवावर उतरवण्याचे महत्त्वपूर्ण योगदान सुरेश भट यांचे राहिलेले आहे.

**"माणसाच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी**
**माझीयासाठी न माझा पेटण्याचा सोहळा"**

'रंग माझा वेगळा' या गझल संग्रहातील ही द्विपदी अत्यंत बोलकी आहे. त्यामध्ये मध्यरात्री हिंडणारा सूर्य ही प्रतिमा विविध अर्थछटा व्यक्त करते. पेटणे यातून चिडणे ,संतापणे,अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे या विविध अर्थछटा यासाठी पेटण्याचा सोहळा असा हा शब्दप्रयोग वापरलेला आहे. यातून भटांची कलंदर वृत्ती व सामाजिक बांधिलकी दिसून येते. स्वरचित गझलांची स्वतःच्याच आवाजातील गायनाचे कार्यक्रम दमदारपणे सादर करून त्यांनी एल्गार सुरू केला. रसिक मान्यता मिळाली.मोठ्या संख्येने सशक्त गझल लिहायला लागलेली तरुणाई हे एल्गारचे फलित होय.

**" जरी ह्या वर्तमानाला कळेना आमुची भाषा**
**विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही."**

महाराष्ट्रात यापुढे अधिकाधिक उत्कृष्ट व निर्दोष मराठी गझला लिहिल्या जातील अशी मी आशा बाळगतो.' एल्गार 'या गझलसंग्रहातील प्रकाशित झालेल्या लेखातील उद्गार सुरेश भटांचे आहे .आणि म्हणून सुरेश भटांच्या गझलेची प्रेरणा घेऊन त्यांच्या संकल्पनेतील विजा घेऊन आलेल्या ह्या नवीन गझलकार पिढीने मनावर घेतले तर उत्तमोत्तम मराठी गझल एवढेच नाही तर आंबेडकरी गझल लिहिल्या जाऊ शकते हे प्रथित यश गझलकरांनी सिद्ध केलंय.

भाऊ पंचभाई:- भाऊ पंचभाई यांचा जन्म नागपूर पासून शंभर किलोमीटर अंतरावर असलेल्या पिंपळगाव खेड्यात झाला. शैक्षणिक कारकीर्द नागपूर येथे घडत असताना भाऊंचा संबंध विद्यार्थी दशेत आंबेडकरी चळवळीशी आलेला होता.

यशवंत मनोहरांच्या सहवासाने त्यांना काव्याची ओढ लागली .त्यांचा ' हुंकार वादळाचा,' हा

कवितासंग्रह काव्य व गझल असा मिश्र काव्यप्रकार आहे . गझलेचे तत्त्वज्ञान भाऊ पंचभाई यांना सुरेश भटांनी शिकविले. सुरेश भटांना भाऊंच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव होती. ते भाऊंच्या झोपडीत धावत गेले त्यांनी मायेची फुंकर घातली .एक कवी दुसऱ्या कवीच्या पोटासाठी धावून गेला. आंबेडकरी चळवळीला जिवंत ठेवण्याचे काम वैचारिक साहित्य कविता व गझल यांनी केले. कवीच्या छावणीत भाऊंनी आपले वास्तव्य वाढवले. आणि त्यांनी आंबेडकरवादी गझल मधून सामाजिक जाणिवेच्या गझला लिहून मानवतावादी विचारांची पेरणी केली.

**हृदय चक्रधर:**

नागपूर हे आंबेडकरी साहित्याची ,काव्य, गझल रसिकांची भूमी राहिलेली आहे .सुरेश भट ,नागोराव पाटणकर सुरमणी प्रभाकर धाकडे गुरुजी यांच्यासारखा गायक वर्ग इथे जन्मला .आंबेडकरी चळवळीचे रोपटे फुलविणारे गझलसम्राट सुरेश भटांचे वास्तव्य याच भूमीत गझलेला शास्त्रीय बाराखडी देण्याचे श्रेय भटांना जाते. त्यामुळे सुरेश भटांच्या सानिध्यात अनेक गझलकार रुपी रोपट्याचे वृक्षात रूपांतर झालेले आहे .यामध्ये बंजारा समाजाचे ताराचंद मोहन चव्हाण आहे . हृदय चक्रधरांनी सुरेश भटांकडे गझलेतील शेर, रदीफ ,काफिया,सानी मिसरा, यांचे शास्त्रीय शिक्षण घेतले आहे. भटांच्या सहवासाने चक्रधरांच्या मनात गझल भिनली. हृदय चक्रधर यांच्या गझलेचे विषय वेदना ,गरीब, भूक ,बेकारी हे आहे.

**"या निखाऱ्यांच्या फुलांची लेखणी झाली सुगंधी**
**पेटणाऱ्या या गळ्याचे गाणं आहे ज्ञानसूर्या"**

ज्ञान सूर्याच्या विचाराने प्रेरित होऊन धगधगत्या अग्निज्वाळाची लेखणी गझल रूपाने सुगंधी होऊन शोषितांच्या व्यथावेदनेला गळ्याचे गाण आलेले आहे असा सूचक अर्थ हृदय चक्रधर स्पष्ट करतात.

**सिद्धार्थ भगत:**

यवतमाळ येथील प्रतिथयश गझलकार म्हणून ज्यांचं नाव घेतल्या जाते असे सिद्धार्थ भगत यांची गझल हृदयाचाच नव्हे तर युगाच्या काळजाचा ठाव घेणारी आहे. त्यांची समाज जाणीव अतिशय व्यापक आहे .धर्म ,जाती, वर्ग बंधनाच्या मर्यादेच्या पलीकडे आहे.सामान्यजनासाठी माणूसपणाचा गहिवर जपताना सामान्यच्या व्यथा मांडताना सिद्धार्थ भगत म्हणतात.

**"त्यांनी चोळामोळा केला नंग्यांनी नागोळा केला.**
**सत्तेच्या हातांनी माझ्या देशाचा पाचोळा केला."**

**विनोद बुरबुरे:**

सुरेश भटांचा प्रभाव असलेले विनोद बुरबुरे यांचा "रंग माझा हा निराळा" गझल संग्रह यामध्ये राजकीय सामाजिक वास्तव मांडलेले आहे .जगण्याचे प्रश्न सत्ताधार्यांनी जाणीवपूर्वक नजरे आड केले आहे .जात, धर्म यांचा बाजारात उच्छाद मांडलेला आहे ,अतिरेकी धर्मवाद ,जातिवाद, प्रांतवाद देश विकासास अडथळा आहे अशा आशयाचे विषय घेऊन विनोद बुरबुरे गझल लिखाण करत आहे .

**"आपली वाटते सत्ता जरी ही**
**सर्व डोळ्यातल्या रोषात आपण"**

**किरण कुमार मडावी:**

शेतकरी पुत्र किरण कुमार मडावी हे विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील मोहदा येथील रहिवाशी आहे. 'जिंदगी भाकरीच्या दबावात आहे' या गझल संग्रहात त्यांनी शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मनातील चीड ,आक्रोश , आर्तता,विद्रोह, काळजी, प्रेम आणि विश्वास व्यक्त केलेला आहे.

**" हासणे हे जरी या स्वभावात आहे.**
**जिंदगी भाकरीच्या दबावात आहे."**

किरण कुमार मडावी यांनी या द्विपदीत शेतकऱ्याच्या व्यथा वेदना अधोरेखित केलेल्या आहे .

**रमेश बुरबुरे:**

किरण दादा मडावी यांच्यापासून प्रेरणा घेऊन गझला लिहणारे रमेश बुरबुरे यांचा जन्म घाटंजी तालुक्यातील निम्बर्डा गावी झाला.शेतकरी पुत्र असलेले रमेश बुरबुरे हे एक विद्रोही गझलकार आहे.शासनाकडून शेतकऱ्यांची दिशाभूल कशी होते याची प्रत्यक्ष चित्रण त्यांनी या शेरात केले आहे .

**"प्रत्यक्ष कर्जमाफी**
**देतो म्हणून नुसता**
**करतोय भाषणांनी**
**गर्भार कास्तकारी "**

अन्यायी व्यवस्थेवर घनघाती प्रहार करणाऱ्या गझलेला विश्वस्तरीय स्पर्धेत गझल काव्य प्रकारात द्वितीय क्रमांक मिळालेला आहे, शेतकऱ्याचे मरण हे शासनाचे धोरण हा स्पर्धेचा विषय होता.३सप्टेंबर २०२८ला युगांत शरद जोशी यांच्या ८३ व्या जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये गझल साहित्य प्रकारात यांच्या गर्भार कास्तकारी या गझलेला द्वितीय पुरस्कार मिळाला.

**" एकच मतला एकच शेर**
**जे हक्क पाहिजे ते सारेच दान करते..**
**रक्षा तुझी नि माझी हे संविधान करते"**

नव्या पिढीतील नव्या सामाजिक जाणिवेचे लिखाण करणारे हे आंबेडकरी गझलकार विदर्भाच्या मातीत नव्याने सामाजिक समतेचे बीज पेरण्याचे काम गझलेच्या रूपाने करत आहेत.

**निष्कर्ष:**

मराठीतील आंबेडकरवादी गझल ही शोषित म्हणजे दुर्बल घटकांच्या उत्थानाची त्यांच्या सर्वांनी विकासाची सामाजिक बांधिलकी स्वीकारणारी विचारशील विधा आहे.या गझलेची प्रेरणा ही समता, स्वातंत्र्य ,बंधुत्व ,न्याय इत्यादी संविधानिक मौलिक मूल्य देणारी माणूसपण जपणारी गझल असून नव्या पिढीतील प्रतिथयश गझलकारांनी सुरेश भटांनी दिलेली गझलेची बाराखडी शिकून उत्तमोत्तम मराठी आंबेडकरवादी गझल निर्माण केली.

**संदर्भ:**


१) गझल गुंफा (डिजिटल गझल भाष्य गाथा) संपादक शरद शेजवळ ,भागवत बनसोडे
२) नवे साहित्यशास्त्र डॉ.यशवंत मनोहर ,विजय प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.२८७
३) भगत सिद्धार्थ ,युद्धयात्रा गझल संग्रह ,निनाद प्रकाशन, द्वि. आ.१४ एप्रिल २०१३ पा. क्र.३६
४) बुरबुरे विनोद, रंग माझा निराळा गझल संग्रह , डि ऑन पब्लिशिंग हाऊस, नागपूर, द्वि.आ. २ जुलै २०२२पा.क्र. 23
५) चक्रधर हृदय, ग्रीष्म छाया गझल संग्रह ,सम्यक साहित्य प्रकाशन ,नागपूर प्र.आ.१४ ऑक्टोबर २०१०पा. क्र.२३,९७
६) आकाश बुरेवार यांचा लेख ,देशोन्नती दिनांक ७ जानेवारी २०१९